प्रकरण पाचवे

निष्कर्ष

प्रकरण पाचवे

निष्कर्ष

प्रस्तुत प्रबंधात केशव मेश्राम यांच्या 'धगाडा' आणि 'चिखलचोथा' ह्या कथासंग्रहांचा अभ्यास करण्यात आला आहे. ह्या अभ्यासासाठी पाच प्रकरणे पाडण्यात आली आहेत. पहिल्या प्रकरणामध्ये कथेच्या विकासाचा आढावा घेतला आहे. दुसऱ्या प्रकरणामध्ये केशव मेश्राम यांचा व्यक्तिपरिचय आणि साहित्य परिचयाचा आढावा घेण्यात आला आहे. तिसऱ्या प्रकरणामध्ये 'धगाडा' आणि 'चिखलचोथा' ह्या कथासंग्रहातील कथांचा आशय स्पष्ट करण्यात आला आहे. चौथ्या प्रकरणामध्ये केशव मेश्रामांच्या कथा लेखनाच्या वाङ्मयीन अभिव्यक्तीचा आढावा घेतला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये केशव मेश्रामांच्या कथेच्या अभ्यासातून हाती आलेले निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

प्रा. केशव मेश्राम यांच्या कथा लेखनाचा अभ्यास करताना प्रथमत: असे जाणवते की मेश्रामांची कथा ही 'दलितकथा' नसून ती सर्वसामान्य उपेक्षित, पिडीत, कष्टकरी, महानगरात चिखलचोथा होऊन पडणाऱ्या माणसांची कथा आहे. केशव मेश्रामांना केवळ दलित कथाकार म्हणणे चुकीचे ठरते. कारण त्यांनी दलितांसह इतरही समाजातील लोकांच्या जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या कथा निर्माण केल्या आहेत. तसेच सगळ्या माणसांना समतेनं जगता यावं, त्यांना विकासाची संधी मिळावी, 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हा संदेश प्रत्यक्ष अंमलात यावा हे त्यांच्या लिखाणाचं सूत्र असल्याचे जाणवते.मेश्राम हे जन्माने दलित असले तरी त्यांनी आपल्या जातीचे कधी भांडवल केले नाही. जातीच्या नावाखाली स्वत:विषयी इतरांच्या मनात सहानुभूती निर्माण करण्याचा प्रयत्न केला नाही. आपल्या जातीचा बावटा कधीच हाती घेऊन मिरवला नाही. दलित, उपेक्षित, सवर्ण या सर्वांच्या सुखदु:खांशी त्यांची कथा तद्रुप होते, त्यांच्यातील अंतर्भेद नष्ट करते. मानवी अवहेलना, दु:ख यांचा प्रत्यय त्यांच्या 'धगाडा' आणि 'चिखलचोथा' या कथासंग्रहातून आपणास येतो.

'धगाडा' हा विदर्भातील शेकोटीचा एक प्रकार आहे. खूप थंडी पडली की सगळे लोक एका ठिकाणी गोळा होतात आणि शेकोटी पेटवतात. ह्या शेकोटीसाठी सर्वांना जळण आणावे लागते. या जळणाला सासू-सासरे म्हणतात. ही शेकोटी पेटवणारी माणसं गरीब, अर्धपोटी, काबाडकष्ट करून आपले जीवन जगणारी आहेत. काबाडकष्ट करूनदेखील त्यांच्या वाट्याला पोटभर जेवण मिळत नाही. त्यामुळे त्यांच्या पोटात कायम भुकेचा 'धगाडा' पेटलेला असतो. 'धगाडा' कथासंग्रहातील माणसं पोटातील भुकेचा 'धगाडा' विझवण्यासाठी प्रयत्न करतात पण त्यांच्या भुकेची आग कधीच विझत नाही.

'चिखलचोथा' ह्या कथासंग्रहाच्या नावावरून यातील कथांच्या आशयाचा अंदाज येतो. मुंबई ह्या महानगरात केशव मेश्रामांनी आपल्या आयुष्यांची बहुतेक वर्षे घालवली. तेंव्हा त्यांना येथील झोपडपट्ट्यांमध्ये 'चिखलचोथा' होऊन बसलेली माणसे दिसली आणि त्यांनी ती आपल्या कथांतून जगासमोर आणली. उदा. गरगर फिरकी कथेतील परताप सरतापे कष्ट करून पैसे कमावतो आणि आपल्या गावाकडे जायचे ठरवतो. तेंव्हा त्याला एका वेश्याखान्यात त्याची बहीण दिसते. 'रंध्राची गोष्ट' मधील प्राध्यापक, वारूळमधील पारू, जाई या बहिणी आणि आत्या नयना ह्यांचे जीवन चिखलचोथ्याप्रमाणे झाले आहे.

केशव मेश्रामांच्या कथांचा रूपबंध सामान्यत: गोष्टीसारखा सरळसोट आहे. बहुतेक कथांमध्ये प्रमुख व्यक्तिरेखांच्या भूतवर्तमानातील घटनांचे इतके तपशील येतात की, कथा आकाराने दीर्घ झाल्या आहेत. मेश्रामांच्या सर्व कथा ह्या तृतीयपुरूषी निवेदनात आहेत. ह्या कथा लघुकथेसारख्या तंत्रबद्ध नाहीत. पण बहुतेक कथांचा शेवट अपमृत्यू, सूडाचे थरारनाट्य, बलात्काराचे प्रसंग अशा घटानांनी झाल्याचे दिसून येते. उदा. 'उंच-उभी माती', 'कुरघोडी', 'वखवख', 'गिळी आपुला उगव' इत्यादी कथांचा शेवट.

केशव मेश्राम यांच्या कथेत दिवास्वप्ने, आभास यांचा अचूक वापर झाल्याचे दिसून येते. उदा. 'अंधारखाई' कथेतील कालीदास लाँचवर स्मगलिंग करण्याचे स्वप्न पाहतो. 'कलती दुपार' कथेतील इब्लिस पैसे मिळाले की पाखरू खाण्याचे स्वप्न पाहतो. 'गिळी आपुला उगव' या कथेमधील माया तारूण्यसुलभ स्वप्ने पाहते.

केशव मेश्रामांच्या कथेतील माणसं पांढरपेशी नाहीत. ती अनेक प्रकारची कामं करून आपलं पोट भरू पाहणारी आहेत. ह्या माणसांना फक्त आपले पोट भरण्याची चिंता आहे. पोट भरण्यासाठी ते कोणतंही काम करण्यास लाजत नाहीत की घाबरत नाहीत. उदा. 'अंधारखाई' कथेतील कालिदास चोऱ्या करतो, 'शोष' मधील बल्लू दारू पोचवण्याचे काम करतो. 'आतल्या आत' कथेतील कृष्णा कॉलेजमध्ये शिकतो पण रात्री रिक्षा चालवतो.

'धगाडा' व 'चिखलचोथा' या कथासंग्रहातील व्यक्ति या भिन्न लिंगी, भिन्न वयाच्या, भिन्न भिन्न जातीच्या, वेगवेगळ्या प्रांतातील, वेगवेगळी भाषा बोलणाऱ्या आहेत. यावरून मेश्रामांनी माणसांच्या वेगवेगळ्या स्तरांचे बारकाईने निरीक्षण आणि अभ्यास केल्याचे जाणवते. त्यांच्या कथांमध्ये व्यक्तिचित्रण अगदी तपशीलवार आले आहे. व्यक्तिचे वर्णन वाचताना ती व्यक्ति अगदी डोळ्यासमोर उभी करण्यात मेश्राम सफल झाले आहेत.

केशव मेश्रामांच्या कथेतील माणसं वाईट दिसत असली तरी ती वाईट नाहीत. परिस्थितीने त्यांना तसे बनवले आहे. उदा. 'अंधारखाई' कथेतील कालिदास चोर नसतो. चोरांचा म्होरक्या गोरधन त्याला रेल्वेस्टेशनवरून पळवून आणतो आणि जबरदस्तीने चोरीचे प्रशिक्षण देतो. 'नुसात्या' कथेतील नुसात्या पाहुण्यांचा अपमान होवू नये म्हणून त्यांना कुत्रीचे मटण खाऊ घालतो. 'कुरघोडी' मधील जगवंता अनेक दिवस अन्याय सहन करतो पण अन्यायाचा अतिरेक झाल्यानंतर तो सुकबीरला ॲसिडच्या पाण्यात ढकलून ठार मारतो.

मेश्रामांच्या कथेत मानवी नातेसंबंधांचे धागे हळूवारपणे उलघडले जातात. केशव मेश्रामांनी आपल्या कथांतून आई-मुलगा, आजी-नातू, मुलगी-बाप, भाऊ-बहिण, बहिणी-बहिणी इत्यादी नातेसंबंध अगदी हळूवारपणे उलघडल्याचे दिसून येतो. उदा. 'उंच उभी माती' कथेतील आजी झुलीबाई आणि नातू वनवास, 'शक्कल' कथेतील भाऊ विकास आणि बहिण शैला. 'वारूळ' कथेतील पारू आणि जाई या बहिणी. यांच्यातील नातेसंबंधाचे उत्कट असे दर्शन मेश्रामांनी घडवले आहे.

केशव मेश्राम यांनी आपल्या बहुतेक कथांमध्ये मनोविश्लेषणाचा वापर केला आहे. कथेतील पात्रांची मनोवस्था, त्यांच्या मनात घोळणारे विचार, त्यांच्या मनाची द्विधावस्था, मनाचा चलबिचलपणा, विक्षिप्तपणा, प्रेमभावना, वासना, इत्यादी मनोवस्थेचे विश्लेषण त्यांनी आपल्या कथांतून केल्याचे जाणवते. 'धगाडा' आणि 'चिखलचोथा' ह्या कथासंग्रहातील बहुतेक कथांमध्ये पात्रांचे मनोविश्लेषण केल्याचा प्रत्यय येतो.

केशव मेश्राम यांच्या कथेतील माणसे शोषित, पीडित आहेत, पण ती दैववादी नाहीत. ती कष्टावर विश्वास ठेवणारी आहेत. दोन वेळचे जेवण कसे मिळेल, त्यासाठी कशाप्रकारे कष्ट करायला हवे याचा विचार करणारी आहेत. आपण गरीब आहोत आपल्याला चांगले जीवन मिळावे म्हणून ती देवाकडे विणवणी करणारी नाहीत. कष्ट करून सुख मिळवण्याचा प्रयत्न ही माणसं करतात पण त्यांच्या वाट्याला ते कधीच येत नाही. ह्या माणसांच्या जीवनात अनेक अडीअडचणी येतात. ह्या अडचणींना तोंड देण्यातच त्यांचे आयुष्य संपून जाते. 'उंच उभी माती' मधील झुलीबाई काबाडकष्ट करून आपल्या नातवाला वाढवते. 'नुसात्या' कथेतील नुसात्या खुदाईची कामे करून आपल्या एकुलत्या एका मुलीला वाढवतो आणि तिचे लग्न करतो. आपल्या शिक्षणाचा खर्च काढण्यासाठी 'आतल्या आत' मधील कृष्णा रात्ररात्रभर सायकलरिक्षा चालवतो.

शहरं वाढतात ग्रामीण भागातून हजारो कामगार शहरात येतात. गावाकडची नातीगोती विसरून टिचभर पोट भरण्यासाठी शहराच्या पसाऱ्यात विरळून जातात. या

महाकाय शहरात त्यांचे अस्तित्व नगण्य होते, त्यांच्या भावना अबोल होतात. यंत्राच्या किंकाळ्या ऐकत जीवन जगत शोषणाच्या चक्रात ही माणसं चिरडली जातात, भरडली जातात. यातून एक समाज तयार होतो. परंतु शहरात उरतो तो फक्त गरीब, भिकारी, कष्ट करणाऱ्या माणसांचा चिखलचोथा, याचे प्रत्ययकारी चित्रण मेश्रामांच्या कथेत येते. ह्या महानगरामध्ये अनेक लोक किड्यामुंगीप्रमाणे राहतात. अनेकजण भूकेचे, वासनेचे, अपघाताचे बळी ठरतात. महानगराच्या अनेक समस्या मेश्राम आपल्या कथेत मांडतात. या समस्यांमध्ये राहण्याच्या, जगण्याच्या, नोकरीच्या, नातेसंबंधांच्या समस्या असल्याचे दिसून येते. 'कलती दुपार' मधील इब्लिसला पोटभर अन्न मिळत नाही. शिक्षणाची प्रचंड इच्छा असणाऱ्या कृष्णाला शिक्षणासाठी पैसे मिळत नाहीत. 'उंच उभी माती' मधील वनवासला चांगली नोकरी मिळत नाही. तर 'गरगर गिरकी' मधील परताप सरतापेला गॅरेजमध्ये नोकरी मिळून देखील त्याला पगार मिळत नाही. अशा अनेक प्रकारच्या समस्या मेश्रामांच्या कथेतून समोर येतात.

केशव मेश्राम यांच्या कथेत स्त्रियांची अनेक रूपे पहावयास मिळतात. ह्यामध्ये अत्याचारग्रस्त स्त्रिया, परिस्थितीशरण स्त्रिया, वासनेला बळी पडणाऱ्या स्त्रिया, व्याभिचारी स्त्रियांचे चित्रण केल्याचे जाणवते. 'पाठपुरावा' मधील सुलकीला तिचा नवरा आपल्या मित्राशी संबंध ठेवण्यास भाग पाडतो. राजबलीच्या लज्जो या मुलीवर, तसेच 'वारूळ' मधील पारूवर, 'वखवख' मधील शुभांगी, 'गिळी आपुला उगव' मधील माया या सर्व स्त्रियांवर बलात्कार होतो. मेश्रामांच्या कथेत व्याभिचारी स्त्रियांचीही नोंद घेण्यात आली आहे. पण ही स्त्री केवळ चैनीसाठी स्वेच्छेने व्यभिचार किंवा वेश्याव्यवसाय करत नाही तर तिला कुणीतरी फसवून धंद्याला लावलेले असते. मेश्रामांच्या कथेतील स्त्री स्वत:हून कधी व्यभिचार करताना दिसत नाही तर ती काही कारणांमुळे वासनेचा बळी ठरलेली आहे. मेश्रामांच्या लेखनातून स्त्री-पुरूषातील अनैतिक संबंध, शरीरभोगाचे भडक वर्णन झाल्याचा आरोप काहींनी केला आहे. पण मेश्राम ज्या परिस्थितीतील स्त्रियांचे वर्णन करतात ती परिस्थिती जगासमोर येण्यासाठी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आणि त्याचे गांभीर्य लोकांना समजण्यासाठी अशी वर्णने करणे गरजेचच असते. त्याशिवाय त्या घटनेची दाहकता, त्या व्यक्तिंवर झालेल्या अन्यायाबाबत माणसाच्या मनात चीड निर्माण होत नाही. तेंव्हा कथानकाची गरज म्हणून मेश्रामांनी ती वर्णने केल्याचे जाणवते.

केशव मेश्रामांच्या कथेत अनेक वृत्ती-प्रवृत्तींची माणसे पहावयास मिळतात. ही माणसे काल्पनिक नाहीत. मेश्रामांनी यातील ही माणसे अकोला, मुंबईतील दादर, कुर्ला येथे राहत असताना पाहिली आहेत. ह्या माणसांचे जीवन न्याहाळून त्यांच्या जीवनाला कथारूप दिले आहे. मेश्रामांची कथा कल्पनाविश्वातील नाही तर ती वास्तव जीवन चित्रित करणारी आहे.

मेश्राम ह्यांच्या कथा ह्या सरळ, साध्या-सोप्या अशा आहेत. शोष, आतल्या आत, कुरघोडी, हादरा, शक्कल, भूक, वखवख अशा शीर्षकांवरूनच त्या कथांचा आशय प्रथमत: लक्षात येतो. कथा कोणत्या आशयाची असेल याचा पूर्वग्रह माणसाच्या मनात निर्माण होतो आणि जसजसे पुढे ती वाचत जाईल तसतसे तो पूर्वग्रह सत्यात उतरत जातो.

केशव मेश्राम यांनी विपुल कथालेखन केले आहे. मेश्रामांना दलित कथाकार म्हणून ओळखले जाते. पण मेश्रामांची कथा ही सर्व जाती धर्मातील माणसांचे जीवन चित्रित करते. जातीने दलित असणाऱ्या माणसांच्या कथा त्यांनी लिहिल्या आहेत पण मुंबईतील बकाल वस्तीत राहणारे, विविध प्रांतातून पोट भरण्यासाठी आलेले गरीब, कष्टकरी, शोषित, पिडीत अशा व्यापक अर्थाने दलित असणाऱ्या माणसांच्याच कथा त्यांनी लिहिल्या आहेत. मेश्रामांना दलित कथाकार म्हणून संबोधले जात असले तरी मेश्रामांनी कोणत्याही कथेत दलित, सवर्ण असा भेदभाव केलेला नाही. जाती व्यतिरिक्त अनेक कारणाने दलित असणाऱ्या लोकांनाच मेश्रामांनी आपल्या कथेत जास्त स्थान दिल्याचे दिसून येते. मेश्रामांना दलित ह्या शब्दाचा जातीने दलित असा अर्थ अभिप्रेत नव्हता हे त्यांच्या कथांवरून लक्षात येते. मेश्रामांची कथा ही आण्णाभाऊ

साठे, बाबूराव बागूल, शंकरराव खरात यांच्या कथेतील दु:खाचा, विद्रोहाचा सूर स्पष्ट करत नाही मात्र दु:खाचे विविध प्रकार मांडताना दिसते.

अशा प्रकारे केशव मेश्राम यांची कथा ही दलितांची नसून ती सर्वसामान्य, कष्टकरी, जगण्यासाठी धडपडणारे, शोषित, अन्याय सहन करणारे, अन्यायाचा अतिरेक होता पेटून उठणारे इत्यादींची आहे. त्यामुळे मेश्रामांना दलित कथाकार म्हणणे चुकीचे ठरते. मेश्रामांनी कथालेखन करताना जात, धर्म, वंश, पंथ इत्यादी कोणत्याही गोष्टिंचा विचार केलेला नाही. मेश्रामांनी आपली कथा माणसांची, माणसासाठी आणि माणूस म्हणून लिहिली आहे. हे स्पष्ट होते.